**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक १३ जुलै २०२६**

**ठळक बातम्या**

1. **अयोध्या मंदिर अपहार प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाच्या केंद्र आणि राज्य सरकारला तसंच श्री रामजन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाला नोटिसा.**
2. **शहरांच्या सर्वांगीण विकासासाठी 'अर्बन चॅलेंज फंड' उभारण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश.**
3. **हजरत बाबा ताजुद्दीन यांच्या शतकोत्तर चौथ्या वार्षिक उर्सानिमित्त नागपूरच्या ताजबाग इथं शाही दरबारी संदल भक्तिभावात संपन्न.**
4. **विदर्भात पावसाची उघडीप, प्रशासनाच्या पाणी संवर्धनाच्या उपाययोजना.**

-------------------------------------

रामजन्मभूमी अपहार

अयोध्येच्या रामजन्मभूमी मंदिरात देणग्या आणि दानातल्या वस्तूंचा अपहार झाल्याच्या आरोपांची न्यायालयीन देखरेखीखाली चौकशी करण्याचे आदेश मागणाऱ्या याचिका समूहावर सर्वोच्च न्यायालयान केंद्र आणि उत्तरप्रदेश सरकारला तसंच राममंदिराचं व्यवस्थापन पाहणाऱ्या श्री रामजन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाला नोटिसा बजावल्या आहेत. सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची, आणि न्यायमूर्ती व्ही मोहना यांच्या पीठासमोर याचिकांची सुनावणी होत आहे. या प्रकरणी चौकशी करणाऱ्या उत्तर प्रदेश पोलिसांच्या तपास पथकानं चौकशीच्या प्रगतीचा अहवाल सादर करावा असंही न्यायलयान सांगितलं. उत्तराखंडच्या बद्रीनाथ मंदिरात दान अपहार प्रकरण उघडकीला आलं असून काल रात्री विशेष चौकशी पथकान बद्री केदार मंदिर समितीच्या अध्यक्षांना डेहराडून इथून चौकशीसाठी ताब्यात घेतलं आहे. बद्रीनाथ मंदिरात २ जुलै रोजी दानपेटीतल्या रकमेची मोजणी सुरु असताना त्यातले घोटाळे लक्षात आले आणि समितीने पोलिसांकडे तक्रार दाखल केली होती.त्यानुसार पोलिसांनी विशेष पथक स्थापन करून संशयित आरोपींचा शोध सुरु केला होता. संशयिताला अखेर डेहराडून मधून ताब्यात घेण्यात आलं असून पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज आणि इतर नोंदींची तपासणी सुरु केली आहे.

-------------------------------------

'मन की बात'

पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या २६ जुलै रोजी आकाशवाणीवरच्या 'मन की बात' या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधणार आहेत. हा या मालिकेचा १३६वा भाग असेल. या कार्यक्रमासाठी नागरिकांनी आपल्या कल्पना, सूचना आणि अनुभव २४ जुलै पर्यंत माय जीओव्ही ओपन फोरम, नामो ॲप वर किंवा १८००११७८०० या नि:शुल्क क्रमांकावर कळवण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

---------------------------------------

सूचना मागवल्या

राष्ट्रीय आरोग्य संशोधन धोरणाच्या मसुदा निर्मितीसाठी आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयानं सूचना मागवल्या आहेत. देशाच्या आरोग्य संशोधन प्रणालीला योग्य रूप आणि बळकटी देण्यासाठी या धोरणाची निर्मिती केली जात आहे. नागरिकांच्या आरोग्य सेवांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी विश्वासू, सर्वसमावेशक, स्वावलंबी आणि प्रभावी व्यवस्थेच्या निर्मितीत हे धोरण सहाय्यक ठरेल. विविध हितसंबंधीनी दिलेल्या सूचनांचा आणि शिफारशींचा समावेश करून हे धोरण तयार केलं जाणार आहे. त्यामुळे इच्छूकांनी २७ जुलैपर्यंत आपल्या सूचना सादर कराव्यात असं आवाहन मंत्रालयानं केलं आहे.

---------------------------------------

अर्बन चॅलेंज फंड

शहरांच्या सर्वांगीण आणि सर्जनशील विकासासाठी ‘अर्बन चॅलेंज फंड’ उभारण्याची आवश्यकता असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.‘वर्षा’ निवासस्थानी झालेल्या नगर विकास विभागाच्या आढावा बैठकीत त्यांनी या अभियानाच्या आराखड्याचा आढावा घेतला. केंद्र व राज्य शासनाच्या निधीसोबत कर्जरोखे आणि सार्वजनिक-खासगी भागीदारीतून निधी उभारणीवर भर देण्याचे निर्देश त्यांनी दिले. या अभियानांतर्गत डिजिटल प्रशासन, पाणीपुरवठा, स्वच्छता, वाहतूक, शहरांचे पुनर्विकास, ट्रान्झिट हब आणि सायकलस्नेही प्रकल्पांसह २२ प्रमुख घटकांचा समावेश असेल. अभियानासाठी सुमारे ९० हजार कोटी रुपयांचा प्रकल्प निधी प्रस्तावित असून, महाराष्ट्रात ४४ हजार ८०० कोटी रुपयांच्या प्रकल्पांना चालना मिळू शकते, अशी माहिती बैठकीत देण्यात आली.

---------------------------------------

ताडोबा-अंधारी

ब्रिक्स परिषदेसाठी नागपूरमध्ये आलेल्या सदस्य देशांचे मंत्री आणि इतर प्रतिनिधींनी चंद्रपूर जिल्ह्यातल्या ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाला भेट दिली. जवळपास ७० प्रतिनिधींनी जंगल सफारी केली. ताडोबातील समृद्ध जैवविविधता आणि व्याघ्र संवर्धनासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचे प्रतिनिधींनी विशेष कौतुक केलं.

--------------------------------------

वारकरी अपघात

पुणे जिल्ह्यातील सासवड-जेजुरी मार्गावर संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीच्या पुढे चालणाऱ्या वारकरी दिंडीला ट्रकची धडक बसून तीन वारकरी महिलांचा जागीच मृत्यू झाला, तर चार जण जखमी झाले. ट्रक चालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले असून मृत महिला सांगली जिल्ह्यातील कसबेडिग्रज येथील रहिवासी होत्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत जाहीर केली असून, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि एकनाथ शिंदे यांनी घटनेबद्दल शोक व्यक्त करत वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी दक्षता घेण्याचे आवाहन केले.

--------------------------------------

कोरोना भत्ता

कोरोना काळात २४ महिने सेवा बजावूनही जाहीर केलेला कोरोना भत्ता न मिळाल्याच्या निषेधार्थ हजारो अंगणवाडी सेविका, मदतनीस आणि आशा वर्कर्स यांनी आज गडचिरोली जिल्हा परिषद कार्यालयावर विराट मोर्चा काढला. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे नेते प्रा. रमेशचंद्र दहिवडे, किशोर जामदार, अमोल मारकवार आदींच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनात कोरोना भत्ता तातडीने अदा करणे, पेन्शन आणि ग्रॅच्युइटी लागू करणे, मोबाईलवरील कामाचा प्रोत्साहन भत्ता आणि थकीत टीए-डीए देण्याची मागणी करण्यात आली. तसेच योजनेबाहेरील कामे देणे बंद करण्याचीही मागणी आंदोलकांनी केली.

--------------------------------------

उर्स

हजरत बाबा ताजुद्दीन यांच्या शतकोत्तर चौथ्या वार्षिक उर्सानिमित्त रविवारी ताजबाग येथे शाही दरबारी संदल मोठ्या भक्तिभावात आणि उत्साहात काढण्यात आला. सूफी कलाम आणि कव्वालीच्या सुरावटींमध्ये देशभरातून आलेल्या हजारो भाविकांनी संदलमध्ये सहभाग घेतला. यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनीही

उपस्थित राहून बाबा ताजुद्दीन यांच्या दर्ग्यावर चादर अर्पण करत देशाच्या शांतता, ऐक्य आणि समृद्धीसाठी प्रार्थना केली.

***(होल्ड बाईट - केंद्रीय मंत्री नितीन गडकरी)***

हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्टतर्फे देशवासियांना अमन आणि बंधुभावाचा संदेश देण्यात आला. ट्रस्टचे अध्यक्ष प्यारे जिया खान, सचिव ताज अहमद राजा, उपाध्यक्ष डॉ. सुरेंद्र जिचकार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

-------------------------------------

घेराव

गोसीखुर्द प्रकल्पाच्या उजव्या कालव्यातून शेतीसाठी पाणी न सोडल्याच्या निषेधार्थ भंडारा जिल्ह्यातील पवनी तालुक्यात शेतकरी नेते किशोर पंचभाई यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी पवनी पंप हाऊसवर अधिकाऱ्यांचा घेराव केला. पावसाअभावी धान पिके धोक्यात आल्यान तातडीन पाणी सोडण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली. गोसीखुर्द प्रशासनान आज सायंकाळपर्यंत कालव्यात पाणी सोडण्याचे आश्वासन दिल्यानंतर शेतकऱ्यांनी आंदोलन मागे घेतले.

-------------------------------------

जनआंदोलन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान भारतरत्न प्रदान करण्याच्या मागणीसाठी अमरावती जिल्ह्यातील तिवसा येथील शासकीय विश्रामगृहात गुरुदेवभक्तांची बैठक झाली. या बैठकीत राज्यभर जनआंदोलन उभारण्याचा निर्धार व्यक्त करत लवकरच 'भारतरत्न समिती' स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. सुप्रसिद्ध व्याख्याते रवी मानव, डॉ. संजय आदमने, सुनील देशमुख, मुकुंद पूनसे आदी मान्यवर उपस्थित होते. केंद्र शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून राष्ट्रसंतांना भारतरत्न मिळेपर्यंत लढा सुरू ठेवण्याचा निर्धार बैठकीत व्यक्त करण्यात आला.

-------------------------------------

पाठिंबा

नीट पेपरफुटी प्रकरणात केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी दिल्लीतील जंतरमंतरवर सुरू असलेल्या सोनम वांगचूक यांच्या प्राणांतिक उपोषणाला शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी पाठिंबा जाहीर केला. केंद्र सरकार विद्यार्थ्यांच्या भवितव्याच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करत असल्याची टीका त्यांनी केली. 20 तारखेला जंतरमंतरवरील आंदोलनात

सर्व राजकीय पक्ष, खासदार, युवक आणि पालकांनी सहभागी होण्याचे आवाहनही ठाकरे यांनी केले.

-------------------------------------

हवामान

येत्या पंधरा तारखेपर्यंत विदर्भात हवामान सामान्य राहणार असल्याचा अंदाज नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागान वर्तवला आहे. पंधरा तारखेला भंडारा आणि गडचिरोली जिल्ह्यामध्ये वादळी पर्जन्यमान राहू शकतं. तत्पूर्वी आज नागपुरात अधून मधून ढगाळ वातावरण असल्यान वातावरणातील उकाडा वाढला आहे. अकोल्यात गेल्या पाच दिवसापासून  कडक उन्ह असल्याच आमच्या प्रतिनिधी न कळवल आहे. दरम्यान हवामानातील बदल आणि भविष्यातील संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन अकोला महानगरपालिकेन नागरिक, गृहनिर्माण संस्था, शैक्षणिक आणि औद्योगिक आस्थापनांना वर्षाजल संधारण प्रणाली उभारून पावसाच्या प्रत्येक थेंबाच संवर्धन करण्याच आवाहन केल आहे. भूजल पुनर्भरण, जलसुरक्षा आणि पर्यावरण संवर्धनासाठी "पावसाचे पाणी अडवा, जमिनीत मुरवा" हा संदेश मनपान दिला आहे. चंद्रपूर इथं आज कमाल ३६ दशांश अंश सेल्सिअस तर यवतमाळ इथं २१ दशांश अंश इतक्या किमान तापमानाची नोंद झाली.

-------------------------------------

जपान ओपन सुपर ७५०'

जपानच्या टोक्यो इथं उद्या पासून सुरू होणाऱ्या 'जपान ओपन सुपर ७५०' बॅडमिंटन स्पर्धेत भारताची अव्वल पुरुष दुहेरी जोडी, सात्विक साईराज रनकीरेड्डी आणि चिराग शेट्टी भारताचं नेतृत्व करेल. भारताचं एकेरीतील आव्हान लक्ष्य सेन, पी. व्ही. सिंधू आणि आयुष शेट्टी यांच्यावर असेल.स्पर्धेची बक्षीस रक्कम ९ लाख ५० हजार अमेरिकी डॉलर्स इतकी आहे.

-------------------------------------

भारतीय व्यवस्थापन संस्थान

गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यांच्या अतिदुर्गम भागातून आलेली आणि कुटुंबातील पहिलीच पदवीधर होऊ पाहणारी १८ आदिवासी मुले सोमवारी भारतीय व्यवस्थापन संस्थान (IIM)नागपूरच्या जागतिक दर्जाच्या कॅम्पसमध्ये पोहोचली. अद्ययावत वर्ग, भव्य लायब्ररी आणि अत्याधुनिक पायाभूत सुविधा पाहणे या विद्यार्थ्यांसाठी एक स्वप्नवत अनुभव ठरला. चंद्रपूरच्या ‘जागृत’ संस्थेच्या पुढाकाराने आयोजित या अभ्यास दौऱ्याने माडिया आणि कोलाम या आदिम समुदायाच्या नव्या पिढीला

जगण्याची आणि शिक्षणाची एक नवी दृष्टी दिली. विद्यार्थ्यांच्या या चमूत ६ मुलींचाही समावेश होता.

-----------------------------------------